**नि.फौ.ख.क्र.४४/२०२०**
सरकार – वि.- बबलु
**निशाणी क्र. २०**

**<u>सरकारपक्षा तर्फे साक्षीदार क्र. १ -</u>**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की,

माझे नाव – संगिता सतिश पेटकर (फिर्यादी)
वय – ५८ वर्षे, व्यवसाय – काही नाही,
सध्या रा. - डोंबीवली पुर्व.

**<u>सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती ए.एस.काळे यांचेमार्फत शपथेवर सुरु-</u>**

घटना दि. २७/०६/२०१८ रोजी पुणे रेल्वे स्टेशन येथे रात्री ०८.१५ वाजण्याच्या दरम्यान घडली आहे. मी त्यादिवशी कुर्डुवाडी स्टेशनवरुन बिदर एक्सप्रेस या ट्रेनमध्ये कल्याणला जाण्याकरीता बसले होते. आरोपी हा दरवाजात उभा होता. तो मला दुस-या सिटवर बसण्याकरीता विनंती करत होता. मी त्यास नकार दिला. त्याच्या सोबत असलेला एक इसम दरवाज्याच्या जवळ उभा होता. मी माझा मोबाईल पाहत होते. कानाला हेडफोन लावलेले होते. गाडी सुटण्याची वेळ झाली होती. गाडी सुटल्यानंतर वेग कमी असताना दरवाजाजवळ उभा असलेला इसम माझेजवळ आला व त्याने माझे हातातील मोबाईल हिसकाटुन घेवुन पळुन गेला. मी आरडाओरडा केला, परंतु तो पर्यंत गाडी पुढे निघुन गेली होती. त्यानंतर मी दुस-या दिवशी डोंबीवली रेल्वे स्टेशन येथे जावुन पोलीसांकडे तक्रार दिली. आता मला माझी तक्रार दाखवण्यात आली. ती तीच असुन त्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यास **नि.क्र. २१** देण्यात येतो.

२. आता मला प्रथम खबरी अहवाल दाखवण्यात आला. तो तोच असुन त्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यास **नि.क्र. २२** देण्यात येतो. मोबाईल् चोरलेला इसम गोरा व कमी वय असलेला होता. त्याचे अंदाजे वय २२ वर्ष ते २३ वर्ष असेल. त्याचे अंगात हिरवा शर्ट व निळया रंगाची जिन्स होती. मी आरोपीला पाहिल्यास ओळखु शकते. तो आज रोजी न्यायालयात हजर नाही.

३. लॉकडाऊनच्या नंतर काही दिवसांनी मला पोलीसांचा फोन आला होता. मी न्यायालयामार्फत मोबाईल मिळवलेला आहे.

**सरतपास पुर्ण**

**<u>आरोपीतर्फे साक्षीदाराचा उलटतपास विधीज्ञ श्री. ए.टी.नावडकर यांच्यामार्फत सुरू-</u>**

४. हे म्हणणे खरे आहे की, ट्रेनमध्ये असलेल्या सोईसुविधांबाबत मला माहिती आहे. ट्रेनमधील हेल्पलाईन क्रमांक त्यावेळी मला माहिती नव्हता. गाडीमध्ये इतर प्रवासी होते. मी गाडीमधील पोलीस कर्मचा-यांकडे याबाबतची तक्रार केली नव्हती. मी घटना घडली त्याच्या पुढच्या स्टेशवर उतरुन आरोपीविरुध्द तक्रार केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी पुढील स्टेशनवर उतरुन तक्रार करु शकले असते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीबाबत त्याचे नाव व पत्ता असे खात्रीशीर मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला आरोपी कोण होता हे सांगितले नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला पोलीस स्टेशनवर आरोपीला ओळखण्याकरीता बोलवले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला ओळखते असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांच्या सांगण्यावरुन त्यास ओळखते असे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझा मोबाईल माझे चुकीने हरवला, परंतु मोबाईल मिळण्याकरीता मी आरोपीविरुध्द खोटी फिर्याद दिली.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत

Digitally signed by CHAVAN NIKHIL JEEVANRAO
Date: 2025.11.24 17:04:16 +0530

**(एन.जे.चव्हाण)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
लोहमार्ग न्यायालय, पुणे.
दि. २४/११/२०२५